दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)

कोकण || वर्ष २ रे || अंक २०७ || बुधवार १० जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||




## हरिहरेश्वर समुद्रकिनारी २०० वृक्षांची लागवड; १००१ वृक्षारोपण करण्याचे संकल्प

श्रीवर्धन कोलमांडाला सोपान निंबरे; दि ९ जुलै २४ रोजी सकाळी ठीक १० वाजताङ्गहरिहरेश्वर ट्रान्सपोर्ट ऍण्ड डेव्हलपर्स संघटने च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी दक्षिण काशी श्रीक्षेत्रहरिहरेश्वर समुद्र किनारा हद्दीत संघटनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. तीन वर्षापूर्वी निसर्गाच्या अवकृपेमुळे संबंधित परिसरामध्येङ्गनिसर्ग चक्रीवादळ चे भयानक परिणाम आणि यामुळे उन्हाळ्यातील भयानक वाढलेल तापमान लक्षात घेऊन, वृक्षारोपण आणि संगोपन हे पवित्र भावना सर्व सदस्यांच्या मनामध्ये उत्पन्न होऊन वृक्षारोपण हाच एकमेव उपाय या प्रकारचे ठराव सर्व सदस्यांच्या मार्फत मंजूर झाला. आज रोजी २०० विविध जातीच्या वृक्षांचे लागवड करण्यात आली. २०० वृक्षरोपणाने सुरुवात करतेवेळी १००१ वृक्षारोपण करण्याचा निर्धार करण्यात आले. संकल्प आणि त्याची सुरुवात लवकरात लवकर करत उरलेले वृक्ष लागवड करण्यात येईल. हे सामाजिक कार्य करताना वृक्षारोपण करण्याची आवड असलेल्या प्रत्येक ग्रामस्थांना व मित्रमंडळींना सामावून घेण्यात आले. ह्या वृक्षारोपण कार्यक्रमात संघटने मधील, सुनील खळे,दीपक देवकर, अच्युत आपटे, प्रदीप टाकळे, उदय(भाऊ) पाटील, सुकृत कोलथरकर, रुपेश मयेकर, धीरज बोरकर, केतन कोलथरकर,भरत पवार, संचित मांडवकर.आपण निसर्गाचे काहीतरी देणे लागतो या पवित्र भावना मनामध्ये जपत हे उपयुक्त उपक्रम नव्हे तर निसर्गाची पूजा या पवित्र भावनेने या सर्व मंडळींनी श्रमभक्ती करून पूर्णपणे सहभाग घेतला.



## रत्नागिरी शहरातील रस्त्यांवर ठोस उपाय योजना न झाल्यास आंदोलन करणार : भाजप आयटी जिल्हा संयोजक निलेश आखाडे.

निकृष्ट रस्त्यांना दोषी कोण जाहीर करा..

रत्नागिरी : रत्नागिरी शहरातील अनेक प्रश्न जैसे थे आहेत. रत्नागिरी शहरातील मुख्य रस्त्यांबरोबर अंतर्गत रस्त्यांची देखील दुरावस्था झाली आहे. वेगवेगळ्या कारणाने खोदण्यात आलेले चर देखील बुजवण्यात आलेले नाहीत. आणि याबाबत रत्नागिरी नगरपालिकेकडे व्यवस्थाही नसल्याचे दिसून येत आहे. मागील वर्षभरामध्ये रत्नागिरी शहरातील मुख्य रस्ता साधारणपणे दोन ते तीन वेळा करण्यात आला. मात्र तरी देखील या रस्त्यांवरील खडी वर येऊन या रस्त्यांवर मोठे मोठे खड्डे पडले आहेत. दररोज या रस्त्यांवर अपघात घडत आहेत. दुचाकी वाहन चालकांना याचा प्रचंड त्रास होत असून, दुचाकी या खाडीवरून स्लिप होत अपघात होत आहेत.



नगरपालिका प्रशासनाने दोन ते तीन वेळा रस्ते करून देखील रस्त्यांची ही अवस्था होत असेल तर यावर नेमकं दोषी कोण? याची जबाबदारी कोण स्वीकारणार..? हे जाहीर करावे. आणि रस्त्यांवर वर आलेली ही खडी त्वरित उचलावी, आणि रत्नागिरी शहर वासियांना रस्त्यांची किमान दुरुस्ती करून दिलासा द्यावा.

पुढील आठ दिवसात याबाबत उपाययोजना न झाल्यास संपूर्ण शहरातील रस्त्यावरील खडी नगरपालिका कार्यालय बाहेर आणून आंदोलन करण्यात येईल असा इशारा भाजप आयटी जिल्हा संयोजक निलेश आखाडे यांनी दिला आहे.

## तिसरे अपत्य असल्यास अनुकंपा लाभासाठी अपात्र; अधिसूचनेनुसार उच्च न्यायालयाचा निर्णय

मुंबई : सरकारी कर्मचाऱ्याला दोनपेक्षा अधिक अपत्ये आहेत. त्यामुळे त्याचे कुटुंब अनुकंपा नियुक्तीच्या लाभास अपात्र आहे, असे निरीक्षण नोंदवीत उच्च न्यायालयाने एका मृत पोलिसाच्या पत्नीने अनुकंपा तत्त्वानुसार मुलाच्या नियुक्तीसाठी केलेला दावा फेटाळला.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करण्यास अपात्र ठरवल्यानंतर या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले होते. न्या. ए. एस. चांदूरकर आणि न्या. राजेश पाटील यांच्या खंडपीठापुढे याचिकेवर सुनावणी झाली. प्रतिवादीने केलेला दावा आणि मॅटच्या निर्णयाचा विचार केला असता, या प्रकरणी आमच्या हस्तक्षेपाची आवश्यकता नाही, असे मत खंडपीठाने व्यक्त केले.याचिकाकर्त्या विद्या अहिरे यांच्या पतीचा २०१३ मध्ये मृत्यू झाल्यानंतर त्यांनी पतीच्या जागेवर मुलाची अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करावी, अशी मागणी केली. परंतु, सरकारने त्यांना लाभ देण्यास नकार दिला; कारण २००१च्या अधिसूचनेनुसार, दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला अनुकंपा नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यात येते.



याचिकाकर्तीचा दावामहाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाची घोषणा) नियम लागू होण्यापूर्वी तिसऱ्या मुलाचा जन्म झाल्यामुळे ही सूचना लागू होत नाही, असा युक्तिवाद याचिकाकर्तीच्या वकिलांनी खंडपीठापुढे केला. राज्य सरकारने न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाचे समर्थन केले.अधिसूचनेतील तरतूद...३१ डिसेंबर २००१ नंतर कुटुंबात तिसरे अपत्य जन्माला आल्यास, अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती दिली जाऊ शकत नाही आणि असे कुटुंब कोणत्याही अनुकंपा नियुक्तीसाठी अपात्र असेल.

## मुलींना यंदापासूनच मिळेल मोफत शिक्षण : पालकांना आठ लाखांची उत्पन्न मर्यादा, सरकारवर ९०६ कोटींचा अतिरिक्त बोजा

मुंबई : व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास, इतर मागासवर्ग या प्रवर्गातील मुलींना मोफत शिक्षण देण्याची तरतूद असलेला शासन निर्णय (जीआर) उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सोमवारी जारी केला. पालकांचे उत्पन्न वार्षिक आठ लाख रुपयांपेक्षा अधिक असणार नाही अशी अट त्यात असेल. या निर्णयाची अंमलबजावणी २०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासूनच करण्यात आली आहे. नवीन प्रवेश घेणाऱ्या आणि आधीपासून प्रवेश घेतलेल्या मुलींसाठीही हा निर्णय लागू असेल. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचा त्यात समावेश असेल. आतापर्यंत या समाजघटकांतील मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के सवलत दिली जात होती. आता ती १०० टक्के करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर वर्षाकाठी ९०६ कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडेल. कारण, माफ केलेल्या शुल्काची



प्रतिपूर्ती राज्य सरकार करणार आहे. ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरिता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लागू असेल. दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची गरज नसेल.

**अनाथ मुलांनाही मोफत शिक्षण**

याच शासन निर्णयात आणखी एक निर्णय असा घेण्यात आला आहे की, अनाथ मुलींबरोबरच अनाथ मुलांनादेखील मोफत व्यावसायिक शिक्षण दिले जाईल. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अनाथांना सरकारी नोकऱ्यांमध्ये एक टक्का समांतर आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला होता.

**मुलींना मोफत**

शिक्षण देण्याचा शब्द आमच्या सरकारने पाळला आहे. आर्थिक क्षमता नसलेल्या पाल्यांना आता मुलींच्या शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करताना आर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही.- चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

**कोणाला लाभ?**

राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील अभ्यासक्रमांमधील मुलींना या निर्णयाचा लाभ मिळेल.

मात्र, खासगी अभिमत विद्यापीठे आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना तो लागू नसेल.

## विधानपरिषद निवडणुकीत ३ आमदारांच्या पक्षाचं वजन वाढलं; पवार, शिंदे-फडणवीसांची भेट

मुंबई : विधानपरिषदेच्या तोंडावर महायुती आणि महाविकासआघाडीकडून मतांच्या जुळवाजुळवीला सुरूवात झाली आहे. बहुजन विकास आघाडीचे प्रमुख हितेंद्र ठाकूर यांनी शरद पवार यांची भेट घेतली.

यानंतर हितेंद्र ठाकूर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठकीला गेले. विधिमंडळात हितेंद्र ठाकूर आणि मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांमध्ये बैठक पार पडली. मुख्यमंत्र्यांच्या दालनात ही बैठक झाली, या बैठकीला आमदार रवींद्र चव्हाणही उपस्थित होते. बहुजन विकास आघाडीचे ३ आमदार कोणाकडे राहणार? याबाबतचा सस्पेन्स अजूनही कायम आहे.

विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी ११ जागांवर १२ उमेदवार रिंगणात आहेत, त्यामुळे बहुजन विकास आघाडीच्या ३ आमदारांना महत्त्व प्राप्त झालं आहे. हे तीन आमदार आपल्यासोबतच राहावे, यासाठी महायुती आणि महाविकासआघाडीकडून प्रयत्न केले जात आहेत.

दुसरीकडे विधान परिषदेच्या



निवडणुकीसाठी भाजपकडून खबरदारी घेतली जात आहे. भाजप सर्व आमदारांना हॉटेलमध्ये ठेवणार आहे. मतांची फाटाफूट होऊ नये, यासाठी सर्व आमदारांना हॉटेलमध्ये ठेवलं जाणार आहे. विधानभवनामध्ये शुक्रवारी विधान परिषदेच्या निवडणुकीचं मतदान पार पडणार आहे.

विधान परिषदेच्या रिंगणात महायुतीचे ९ तर महाविकासआघाडीचे ३ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक होणार असल्यामुळे कुणाचे आमदार फुटणार? याबाबत सगळ्याच पक्षांना चिंता सतावत आहे, त्यामुळे सगळ्याच पक्षांकडून आमदारांना फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये ठेवलं जाणार आहे. काँग्रेसच्या अतिरिक्त आमदारांची मतं कुणाला जाणार?

याची सर्वाधिक चर्चा आहे, कारण काँग्रेसकडे सर्वाधिक अतिरिक्त आमदारांची संख्या आहे.विधान परिषद निवडणुकीमध्ये आमदारांचा कोटा २८ ते ३० ठेवण्याची शक्यता आहे, त्यामुळे उर्वरित ७ आमदार शेकापच्या जयंत पाटील यांना मत देणार का मिलिंद नार्वेकर यांना? विधान परिषदेचा सामना गर्जे विरुद्ध पाटील का पाटील विरुद्ध नार्वेकर होणार? याबाबत राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहेत.

कुणाचे किती उमेदवार रिंगणात?

भाजप

पंकजा मुंडे, परणिय फुके, अमित बोरखे, योगेश टिळेकर, सदाभाऊ खोत

शिवसेना

भावना गवळी, कृपाल तुमाणे

राष्ट्रवादी (अजित पवार)

राजेश विटेकर

शिवाजीराव गर्जे

काँग्रेस

प्रज्ञा सातव

शेतकरी कामगार पक्ष

जयंत पाटील

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मिलिंद नार्वेकर

